मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
मुंबई
आवक क्र. 457
दिनांक 11/4/2014

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : एमआरडी-३३१४/ प्र.क्र.३३/नवि-७
नगर विकास विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु
चौक, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ एप्रिल, २०१४.

प्रति,

महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

विषय : मिठी नदी व वाकोला नाला यांच्या कामातील स्पष्टीकरणाबाबत..
संदर्भ: १) शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३०५/प्र.क्र.१०९/नवि-७, दिनांक १९ ऑगस्ट, २००५
२) मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाचे पत्र क्रमांक मिनविवसंप्रा/ मुंमप्रविप्रा/४५/२०१४, दिनांक २४ फेब्रूवारी, २०१४

महोदय,

मिठी नदीचा विकास व संरक्षण करण्यासाठी संदर्भाधीन एक येथील शासन निर्णयान्वये मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण नावाचे एक स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले आहे. सदर प्राधिकरण हे फक्त समन्वयाचे काम करते. मिठी नदी व वाकोला नाला यांच्या विकास व संरक्षणात्क कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका या दोन्ही संस्थामार्फत करण्यात येतात. मिठी नदी विकास प्राधिकरणास वैधानिक दर्जा नसल्याने मिठी नदीच्या विकासासाठी आवश्यक असलेले भूसंपादन व पुनर्वसन मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणामार्फत करता येत नाही. सदर भूसंपादन व पुनर्वसन नेमक्या कोणत्या संस्थेमार्फत करावे याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सदर संभ्रम दूर करण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने मिठी नदी व वाकोला नाल्याच्या विकास कामांच्या कार्यकक्षेसंदर्भात पुढील प्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

अ) **मिठी नदी संदर्भात,-**

**१)** मिठी नदीचा विहार तलावापासून सांताक्रूझ चेंबूर जोडरस्त्यावरील सीएसटी पूलापर्यंतचा अंदाजे ११.८४ कि.मी. साठी मिठी नदीसंबधातील सर्व कामे राबविणे, तसेच प्रकल्प

AMC/PD
Date: 21/4/14
M.C. OFFICE, 1165
Date: 17.04.14
IT Cell / MMRDA
Inward No: 914
Date: 29/04/2014

अंमलबजावणी करणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, भूमी संपादन करणे, इत्यादीसाठी नियोजन प्राधिकरण व सक्षम प्राधिकरण म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका करील,

२) मिठी नदीच्या सांताक्रूझ चेंबूर जोडरस्त्यावरील सीएसटी पूलापासून माहिम खाडीपर्यतच्या अंदाजे ६ कि.मी. साठी मिठी नदीसंबधातील सर्व कामे राबविणे, तसेच प्रकल्प अंमलबजावणी करणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, भूमी संपादन करणे, इत्यादीसाठी नियोजन प्राधिकरण व सक्षम प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण काम करील.

**ब) वाकोला नाला संदर्भात-**

१)मिठी नदीस मिळणारा वाकोला नाल्याचा विमानतळापासून सांताक्रूझ चेंबूर जोडरस्त्यावरील वाकोला पूलापर्यतचा अंदाजे २ कि.मी. साठी वाकोला पूलांसंबधातील सर्व कामे तसेच प्रकल्प अंमलबजावणी करणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, भूमी संपादन करणे, इत्यादीसाठी नियोजन प्राधिकरण व सक्षम प्राधिकरण म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका काम करील,

२) मिठी नदीस मिळणारा वाकोला नाल्याचा सांताक्रूझ चेंबूर जोडरस्त्यावरील वाकोला पूलापासून मिठी नदी व वाकोला नाला संगम, वांद्रे-कुर्ला संकुल पर्यत अंदाजे १.८ कि.मी.साठी वाकोला नाल्यासंबधातील सर्व कामे तसेच प्रकल्प अंमलबजावणी करणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे, भूमी संपादन करणे, इत्यादीसाठी नियोजन प्राधिकरण व सक्षम प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण काम करील ,

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण हे प्रामुख्याने वरील संस्थामध्ये समन्वय साधेल व शक्तीप्रदत्त समितीने दिलेल्या आदेशाचे अंमलबजावणी करेल.

कृपया संबधित कार्यान्वित संस्थांनी वरील बाबींची नोंद घेऊन मिठी नदी व वाकोला नाला यांच्या विकास कामाबाबत कार्यवाही करावी ही विनंती.

आपला,

**(वि. श्री. पाटील)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-

सदस्य सचिव, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण, व्दारा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला, संकुल, वांद्रे मुंबई-४०० ०५१ यांना माहितीसाठी अग्रेषित.

otalwar\latter.doc